
# पीओपी मूर्तीवर लाल रंगाचे चिन्ह बंधनकारक

## गणेशोत्सवासाठी राज्याची सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :

राज्य शासनाने प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणपतीसह इतर मूर्ती विसर्जनासाठी सुधारित आणि एकत्रित मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असून यात पीओपी मूर्ती उत्पादक आणि विक्रेत्यांना मूर्तीवर लाल रंगाचे गोल चिन्ह करणे आणि विक्रीची नोंदवही ठेवणे बंधनकारक असेल. ग्राहकांना विसर्जनाबाबत माहिती देणारी माहितीपत्रिका देणे आवश्यक आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार पर्यावरणाची काळजी घेत सण साजरे करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने १२ मे २०२० रोजी पीओपी मूर्तींवर बंदी घातली होती, ज्याला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. यानंतर, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान मिशनच्या समितीने पीओपीच्या वापरामुळे जलस्रोतांवर होणाऱ्या परिणामांवर अभ्यास करून ३ मे २०२५ रोजी अहवाल सादर केला. ९ जून २०२५ रोजी उच्च न्यायालयाने पीओपी मूर्ती बनवण्यावरील बंदी उठवली, परंतु विसर्जनाबाबत धोरण तयार करण्याचे निर्देश दिले. शासनाने काही सूचना जारी केल्या.



राज्य शासनाने पीओपीच्या पुनर्वापर आणि पर्यावरणपूरक विघटनासाठी तज्ज्ञ वैज्ञानिक समिती स्थापन केली आहे. या समितीला सहा महिन्यांच्या आत अहवाल सादर करायचा आहे. या समितीच्या माध्यमातून पीओपीच्या पर्यावरणपूरक व्यवस्थापनासाठी व्यापक मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे, पीओपीच्या पुनर्वापर आणि पुनर्वापरासाठी प्रोटोकॉल तयार करणे, पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी सुरक्षित विल्हेवाट यंत्रणा/जलद विसर्जन पद्धती विकसित करणे, पीओपीच्या वापराबाबत जागरूकता वाढवणे आणि पर्यायी जैवविघटनशील पदार्थांवर संशोधन करणे, पर्यावरणपूरक पीओपी उत्पादनांसाठी प्रमाणीकरण मानके ठरवण्यात येणार आहे. या समितीमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आयसीटी मुंबई, आयआयटी मुंबई, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा पुणे, येथील प्रतिनिधींचा समावेश आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांना ६ फुटांपर्यंतच्या मूर्तींसाठी पुरेशा कृत्रिम तलावांची व्यवस्था करावी लागेल आणि सर्व लहान मूर्तींचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावांमध्येच होईल याची खात्री करावी लागेल. नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जनाची परवानगी असलेल्या मोठ्या मूर्तींच्या बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशीच विसर्जित साहित्य उचलून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची दक्षता घ्यावी लागणार आहे. ही मार्गदर्शक तत्त्वे मार्च २०२६ पर्यंत साजऱ्या होणाऱ्या सर्व सणांसाठी लागू असतील, असे सांगण्यात आले आहे

## सनातन धर्माने भारताचे वाटोळे केले : जितेंद्र आव्हाड



**मुंबई :** सनातन धर्माने भारताचे वाटोळे केले आहे. सनातन नावाचा धर्मच नव्हता. आम्ही हिंदू धर्माला मानणारे आहोत. सनातनी लोकांना विकृत म्हणायला घाबरले नाही पाहिजे, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केले. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात कोर्टाने दिलेल्या निर्णयावर बोलताना केलेल्या एका विधानावर प्रतिक्रिया देताना जितेंद्र आव्हाड यांनी हे विधान केले आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी मालेगाव बॉम्बस्फोटाप्रकरणी विशेष एनआयए कोर्टाने दिलेल्या निर्णयावर भाष्य करताना कथित भगव्या दहशतवादावर भाष्य केले होते. भगव्या दहशतवादाला भगवा दहशतवाद न म्हणता सनातन किंवा हिंदुत्ववादी दहशत वाद म्हणा, असे विधान करून त्यांनी नव्या वादाला फोडणी दिली. त्यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना जितेंद्र आव्हाड यांनी उपरोक्त मोठे विधान केले.

## चिरानगरच्या रहिवाशांसाठी सुप्रिया सुळे यांचे देवेंद्र फडणवीसांना साकडे



**मुंबई :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी बाधित होणाऱ्या नागरिकांना त्याच परिसरामध्ये सदनिका देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष लक्ष देण्याचे मागणी देखील त्यांनी केली आहे. या संदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले आहे. या प्रकल्पामध्ये साधारण 200 ते 220 कुटुंबे बाधित होत असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. त्यामुळे या परिसरातील घरांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण प्राधान्याने हाती घेण्यात यावे, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. एकही कुटुंब सुटू नये, असे या विस्थापित होणाऱ्या कुटुंबाचे म्हणणे असल्याचे सुप्रिया सुळे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

## आजची तरुण पिढी भारताला पुढे घेऊन जाणार

■ महासागर प्रतिनिधी
ठाणे, दि. ३ :

भारत देश हा तरुणांचा देश आहे. ही तरुण पिढी आपल्या भारत देशाला पुढे घेऊन जाण्याचे काम करणार आहे, असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात बोलताना केले. ठाणे शहरात यंग इंडिया ॲथलिट्स संस्थेच्या वतीने यंग इंडिया मॅरेथॉन २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉनच्या शुभारंभाच्या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वक्तव्य

यावेळी त्यांनी उपस्थित स्पर्धकांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, ठाणे शहरात दरवर्षी आयोजित केली जाणारी वर्षा मॅरेथॉन ही स्वर्गीय सतीश प्रधान यांच्या संकल्पनेतून साकारलेली असून, ते या मॅरेथॉनचे खऱ्या अर्थाने जनक आहेत. त्यांनी ठाण्यात वर्षा मॅरेथॉन सुरु केली. त्यानंतर, महापौर वर्षा मॅरेथॉन झाली, त्यापाठोपाठ अनेक मॅरेथॉन शहरात सुरु झाल्या आहेत. आता, यंग इंडिया ॲथलिट्स संस्थेच्या वतीने मॅरेथॉन २०२५चे आयोजन करण्यात आले आहे.

या मॅरेथॉनमध्ये २ हजार धावपटू धावणार आहेत. मॅरेथॉन ही स्पर्धा निरोगी आरोग्यासाठी असल्याची जागृकता सर्वांमध्ये निर्माण झाली आहे. या मॅरेथॉनमध्ये प्रत्येकजण धावणार आहे तो स्वतःसाठी, शहरासाठी, विकासासाठी, प्रगतीसाठी, समृद्ध महाराष्ट्र घडवण्यासाठी आणि सशक्त व समृद्ध भारत साकारण्यासाठी, असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केले. ठाणे हे विकासाचे शहर आहे, ठाणं हे बदलत आहे, शहराचा विकास होतोय आणि प्रगती होत आहे आणि या ठाण्याच्या विकासासाठी प्रगतीसाठी आपण सगळेजण एकत्र धावूया असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मॅरेथॉनचा शुभारंभ केला.

## ऑटो उलटून महिला ठार
### दोन मुलींसह पाच जण जखमी

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३ :

अमरावतीकडून लेहगावकडे जाणारा प्रवासी ऑटो अनियंत्रित झाल्यामुळे बोरगावजवळील ड्रिमलँड मार्केटजवळील रस्ता दुभाजकावर आदळून उलटला. या अपघातात महिलेचा मृत्यू झाला. तसेच महिलेच्या दोन मुलींसह पाच प्रवासी जखमी झालेत. दीपाली दिनेश लंगडे (२८, रा. वडगाव माहोरे) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रवासी महिलेचे नाव आहे. याचवेळी दीपाली यांच्या दोन मुली, कमल दिगांबर थोरात (४६) आणि दीक्षा थोरात (२०, सर्व रा. वडगाव माहोरे) आणि गोपाल बापुराव थोरात (६०, रा. रामपुरी कॅम्प, अमरावती) हे जखमी झाले. वडगाव माहोरे येथून शनिवारी दीपाली लंगडे त्यांच्या दोन मुलींसह लेहगावला जाण्यासाठी इतर सहप्रवाशांसह त्या ऑटोमध्ये बसल्या होत्या. नागपूर हायवेवरील बोरगाव धमाळे परिसरात जकात नाका येथे ड्रिमलँड मार्केटच्या गेटजवळ रस्ता दुभाजक आहे. या दुभाजकाच्या डाव्या बाजूला एक पेट्रोलपंप आहे. या पंपवरून एक ट्रक निघाला आणि तो अमरावतीच्या दिशेने जाण्यासाठी यू टर्न घेत होता. या वेळी आपण ट्रकला धडकू नये, या प्रयत्नात ऑटोचालकाचे नियंत्रण सुटले व ऑटो थेट रस्ता दुभाजकावर जाऊन आदळला.

## ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी म्हणताना आदिवासींचा जीव जातोय : विजय वडेट्टीवार



**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत आदिवासी भागांतील बिकट परिस्थितीवरून राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी बनवायचंय, पण प्रत्यक्षात परिस्थिती अशी आहे की आदिवासी नागरिक आजही रुग्णालयात पोहोचण्याआधीच प्राण गमावतायत, अशी बोचरी टीका विजय वडेट्टीवारांनी सरकारवर केली आहे. खऱ्या महाराष्ट्राचे चित्र झाकून टाकायचे आणि हे फसवे आकडे, योजना, परदेशी दौरे, गुंतवणूक परिषदा हा सगळा दिखावा करायचा, कशासाठी? असा खडा सवाल विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ज्यांच्या हातात मुख्यमंत्रीपद होते आणि ज्यांनी आता उपमुख्यमंत्रीपद घेतले ते एकनाथ शिंदे आणि आता विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोघेही पालकमंत्री म्हणून ज्या जिल्ह्यांत गेले, तिथे आरोग्य यंत्रणांची अवस्था काय आहे, हे या व्हिडिओतून दिसते.

## बोरिवली स्टेशनवर प्रवाशाचा टीसीवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

मुंबईच्या लोकल प्रवासात पुन्हा एकदा प्रवाशांची गुंडगिरी समोर आली आहे. आज (शनिवारी) दुपारी 3 वाजण्याच्या सुमारास बोरिवली स्टेशनवर एक धक्कादायक घटना घडली. विरार फास्ट लोकलमध्ये तिकीट तपासणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यात आला, तसेच त्यानंतर टीसी कार्यालयाचीही तोडफोड करण्यात आली. या घटनेमुळे रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

यासंबंधीच्या प्राप्त माहितीनुसार, टीसी समशेर इब्राहिम हे आपल्या कर्तव्यावर असताना अंधेरी रेल्वे स्थानकाहून विरारकडे जाणाऱ्या फास्ट लोकलच्या चर्चगेट बाजूकडील प्रथम श्रेणी डब्यात तिकीट तपासणी करीत होते. यादरम्यान, तीन प्रवाशांना चुकीच्या क्लासच्या तिकिटांसह आणि एकाला विनातिकिट पकडले. त्यांच्याकडून दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी त्याला बोरीवली रेल्वे स्थानकात उतरवून टीसी कार्यालयात नेण्यात आले.

कार्यालयात पोहोचताच एका प्रवाशाने संतापून गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्याने रेल्वे कर्मचाऱ्यांवर हल्ला केला, तसेच कार्यालयातील संगणक आणि इतर सामानाची तोडफोड केली. या हिंसक हल्ल्यात काही रेल्वे कर्मचारी आणि प्रवासी जखमी झाले असून, कार्यालयातील 1.51 लाखांच्या सामानाचे नुकसान झाले आहे. राहुल सुनील रसाळ (वय 23, राहणार धारावी, मुंबई) असे आरोपीचे नाव आहे. या प्रकारानंतर समशेर इब्राहिम यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, बोरीवली रेल्वे पोलिसांनी तत्काळ राहुल रसाळ याला अटक केली आहे. दरम्यान, रेल्वे प्रशासनाने देखील या घटनेची गंभीर दखल घेतली असून, सर्व आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी जीआरपीच्या ताब्यात दिले आहे. याप्रकरणी कठोर कारवाई केली जाईल.

## शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून लोकाभिमुख काम करा : कृषीमंत्री

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३ :

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याचे वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाराणसी येथून ऑनलाइन पद्धतीने झाले. पुणे जिल्ह्यातील ४ लाख ५१ हजार ८५० शेतकऱ्यांच्या खात्यात ९० कोटी ३७ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. या कार्यक्रमादरम्यान पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून दूरदृष्य प्रणालीद्वारे राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते.

कृषी विभागाच्या आढावा बैठकीत बोलताना कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले की भविष्यात शेतीला निश्चितच चांगले दिवस येणार आहेत. त्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून लोकाभिमुख पद्धतीने कार्यरत राहावे असे निर्देश त्यांनी दिले. बैठकीला कृषी आयुक्त




सूरज मांढरे, विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गवसाने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, आत्माचे प्रकल्प संचालक सूरज मडके आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. कृषीमंत्री भरणे यांनी कृषी विभागाची रचना, कृषी विद्यापीठे, संशोधन केंद्रे, महाबीज आणि इतर महामंडळांची संक्षिप्त माहिती घेतली. त्यांनी पीक विमा योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना आणि नमो किसान योजनेबाबत माहिती घेतली.

कृषी आयुक्त मांढरे यांनी सांगितले की 'पीएम किसान सन्मान निधी' योजनेचे राज्यात नोंदणीकृत १ कोटी २३ लाख ९२ हजार लाभार्थी आहेत. २० व्या हप्त्यासाठी ९६ लाख ५१ हजार लाभार्थ्यांच्या खात्यात प्रत्येकी २ हजार रुपयांप्रमाणे एकूण १ हजार ९३० कोटी २३ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. दरवर्षी तीन हप्त्यात एकूण ६ हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जातात.

## तू राजीनामा मागणारा कोण? रामदास कदमांचा परबांवर हल्लाबोल



**रत्नागिरी :** सावली बार प्रकरणावरून राज्याचे माजी पर्यावरण मंत्री आणि शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी माजी मंत्री अनिल परब यांच्यावर जोरदार शब्दात पलटवार केला आहे. "अर्धवट वकील अनिल परब हेतुपुरस्सर बदनामी करत आहेत," असा आरोप करत त्यांनी परब यांच्याकडून सभागृहात मांडलेले आरोप खोटे व दिशाभूल करणारे असल्याचे स्पष्ट केले. तसेच तू राजीनाम मागणारा कोण? असा खडा सवालही रामदास कदम यांनी अनिल परब यांना केला. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्याच नावावर मुंबईमध्ये सावली बार आहे. या बारवरून अत्यंत गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार अनिल परब यांनी केले आहेत. पण तेव्हापासून अनिल परब आणि रामदास कदम यांच्यामध्ये चांगलाच कलगीतुरा रंगला आहे. अशातच आज रामदास कदम यांनी आज रत्नागिरी येथे पत्रकार परिषद घेतली.

## अमोल पालेकर यांना नाफा जीवनगौरव पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांना नाफा जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. नॉर्थ अमेरिकन फिल्म असोशिएशनतर्फे अमेरिकेतील सॅन होजेतील द कॅलिफोर्निया थिएटरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या नाफा ग्लॅमरस फिल्म अवार्ड नाईट या सोहळ्यात पालेकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यंदा हॉलिवुडच्या धर्तीवर नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशनतर्फे सॅनहोजे येथे २५, २६ आणि २७ जुलै या कालावधीत दुसऱ्या नाफा मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. द कॅलिफोर्निया थिएटरमध्ये झालेल्या नाफा ग्लॅमरस फिल्म अवार्ड



नाईट या सोहळ्यात महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि नाफाचे संस्थापक अभिजीत घोलप यांच्यासह मराठी चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गज कलावंत व प्रेक्षक उपस्थित होते.

काही वर्षांपूर्वी गौरी देशपांडे यांच्या कथेवर आधारित चित्रपट करण्याची तयारी मी सुरू केली होती. निकोल किडमन आणि अमिताभ बच्चन या दोघांना घेऊन मराठी चित्रपट बनविण्याचे माझे स्वप्न होते.

निकोलने पटकथा आवडल्याने तात्काळ होकार दिला. मात्र हॉलिवूडमधील कोणत्याही एका स्टुडिओला सोबत घेण्याची अट घातली. या किचकट गोष्टीची कल्पना असल्याने तो विचार मी सोडून दिला. पण आता नाफामाध्यमातून अशी स्वप्ने पूर्ण होतील, अशी आशा अमोल पालेकर यांनी व्यक्त केली.

## रागातून मोटारचालकाला अडवून भर रस्त्यात बेदम मारहाण

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३ :

पुढे जाण्यास जागा न दिल्याने मोटारचालक तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची धक्कादायक घटना सेनापती बापट रस्त्यावरील वेताळबाबा चौकात घडली. तरुणावर वार करुन आरोपी मोटारीतून पसार झाले. या प्रकरणी चतुःशृंगी पोलिसांनी तिघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली. पृथ्वीराज कुमार नरवडे (वय १९, रा. भोसलेनगर, गणेशखिंड रस्ता) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी महेश प्रमोद पवार (वय २९), रोहित अशोक धोत्रे (वय २४), आकाश विलास कुसाळकर (वय ३४, रा. वडारवाडी) यांना अटक करण्यात आली.

## ट्रम्पच्या टेरिफ दणक्यामुळे भारतीय औषध उद्योग संकटात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणात मोठा बदल करत भारतासारख्या औषध निर्यातदार देशांवरील टॅरिफ २५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे.या घोषणेनंतर भारतीय फार्मा उद्योगात अस्वस्थता पसरली असून, यामुळे देशाच्या औषध निर्यातीवर मोठा परिणाम होण्याची भीती जाणकारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

भारतीय औषध उद्योग अमेरिकेत सर्वाधिक जेनेरिक औषधांचा पुरवठा करतो. फार्मास्युटिकल एक्सपोर्ट प्रमोशन काऊंसीलच्या आकडेवारीनुसार, २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताने अमेरिका येथे ८.१ अब्ज डॉलर्स (सुमारे ६७,५०० कोटी रुपये) मूल्याची औषध निर्यात केली होती. या निर्यातीचा ७५ टक्के हिस्सा जेनेरिक औषधांचा होता. यात लुपीन, डॉ रेड्डीज, सिप्ला, सन फार्मा आदी कंपन्या आघाडीवर होत्या.

ट्रम्प यांच्या प्रस्तावित २५ टक्के टॅरिफ लागू झाल्यास, फार्मक्झीलच्या प्राथमिक मूल्यांकनानुसार भारताच्या औषध निर्यातीवर २०२५-२६ मध्ये सुमारे २ अब्ज डॉलर्सपेक्षा



अधिकचा फटका बसण्याची शक्यता आहे. यामुळे भारताच्या अमेरिकन औषध बाजारातील सध्याची ३२ टक्के भागीदारी २५ टक्यांपर्यंत घसरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी, भारताच्या जागेवर ब्राझील, पोलंड आणि मेक्सिको यांसारख्या फ्रेंडली ट्रेड राष्ट्रांना स्थान मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या अहवालानुसार, भारतीय फार्मा उद्योग २०२४ मध्ये सुमारे ५ लाख लोकांना थेट आणि २५ लाख लोकांना अप्रत्यक्ष रोजगार देत होता. यामध्ये निर्यात-आधारित उत्पादन युनिट्सचा मोठा वाटा असून, टॅरिफमुळे उत्पादन कमी झाल्यास अनेक उद्योगांना कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात करावी लागू शकते. औषध उद्योगाचा देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटाही कमी होण्याची शक्यता आहे.

या निर्णयाचा परिणाम भारताच्या अंतर्गत आरोग्य व्यवस्थेवरही जाणवू शकतो. अनेक प्रकारची उच्च दर्जाची जेनेरिक औषधे भारतीय कंपन्यांकडून तयार करून अमेरिकन एफडीएकडून मान्यता घेऊन परत देशांतर्गत वापरासाठीही वापरली जातात. ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे या उत्पादनांच्या किमती वाढण्याची शक्यता असल्याने देशातील गरीब आणि मध्यमवर्गीय रुग्णांना कॅन्सर, मधुमेह, क्षयरोग, हृदयरोग अशा गंभीर आजारांवरील औषध अधिक महाग होतील. एम्स दिल्ली येथील सार्वजनिक आरोग्य धोरणविशारद डॉ. सौरभ गुप्ता यांनी याबाबत चिंता व्यक्त करत म्हटले की, भारतीय औषध उद्योग हा केवळ निर्यात क्षेत्र नव्हे तर जागतिक आरोग्य सुरक्षेसाठी आवश्यक घटक आहे. अमेरिकेत मोठ्या प्रमाणात नागरिक नियमितपणे भारतातून आयात होणाऱ्या जेनेरिक औषधांवर अवलंबून आहेत. टॅरिफ वाढवल्यास केवळ भारतालाच नव्हे, तर अमेरिकी आरोग्य प्रणालीलाही फटका बसेल. वाणिज्य मंत्रालय, आरोग्य मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालय संयुक्तपणे ट्रम्प यांच्या धोरणावर धोरणात्मक प्रतिक्रिया देण्यासाठी जागतिक व्यापार संघटना व अन्य मंचांवर चर्चा सुरू करत आहेत.

## मारहाणीत विद्यार्थ्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ३ :

अशोकनगरच्या ज्ञानगंगा खासगी क्लासेसबाहेर इयत्ता १०वीच्या तीन विद्यार्थ्यांमध्ये बेंचवर बसल्यावरुन झालेल्या वादात एकाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली. यशराज तुकाराम गांगुर्डे (वय १६) असे मयत विद्यार्थ्याचे नाव आहे. शनिवारी (दि.२) सायं. साडेसहाला ही घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी २ विद्यार्थ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. यशराज सातपूरमधीलच एका शाळेत होता. बसने तो क्लासजवळ पोहचताच तेथे थांबलेल्या क्लासमधील दोघांनी त्याच्यावर हल्ला केला. छातीवर गुद्दे बसल्याने नाकातून रक्त येताच तो चक्कर येऊन कोसळला. उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. मुलांमध्ये हिंसंक वृत्ती वाढत आहे. प्राथमिक पातळीवरच ही वृत्ती ओळखणे गरजचे आहे. मोबाईलचा वाढता वापर टाळून मुलांशी संवाद वाढला पाहिजे असे मानसोपचार तज्ञ हेमंत सोननीस यांनी सांगितले. तीन दिवसांपासून यशराजचा दोघांशी वाद सुरु होता. तो नीट जेवत नव्हता, असे त्याच्या आईने सांगितले. मूळचे सुतारपाडा (ता. चांदवड) येथील गांगुर्डे कुटुंब २० वर्षापासून सातपूरमध्ये राहते. कोरोनात वडील वारले. आई व्हॅन चालवते, भाऊ गिरणी चालवतो.

## सत्तेतील अपयश लपवण्यासाठी इतिहासाशी खेळ
### संजय राऊत यांचा मोदी सरकारवर हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :

भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही दोन्ही वैचारिक मंडळी स्वातंत्र्यानंतर उदयास आली. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांचा सहभाग नव्हता आणि महात्मा गांधी, पंडित नेहरू यांच्याशी त्यांचे वैचारिक मतभेद आजही प्रकट पणे जाणवतात. विशेषतः नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सध्याच्या भाजपकडून, संसदेतही नेहरूंवर खापर फोडण्याचे प्रमाण वाढले आहे. ऑपरेशन सिंदूर आणि पहलगाम हल्ल्यावर संसदेत चर्चा झाली, पण त्या चर्चेचे केंद्र मात्र संरक्षण धोरण न राहता पंडित नेहरू ठरले. हा प्रकार भाजपच्या वैचारिक दिवाळखोरीचे निदर्शक ठरतो, असे म्हणत उबाठाचे नेते संजय राऊत यांनी मोदी सरकारवर टीकास्त्र डागले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, नेहरूंच्या मृत्यूनंतर



तब्बल सहा दशकं उलटून गेली आहेत. त्यानंतर अनेक सरकारे आली आणि गेली. 11 वर्षांपासून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप सत्तेत आहे. तरीही आजही देशातील अडचणीसाठी नेहरूच जबाबदार असल्याचे चित्र रंगवण्याचा प्रयत्न सुरू आहे. खरे पाहता, भाजपच्या मुळातच सामाजिक चळवळीत व स्वातंत्र्य लढ्यात सहभाग नव्हता. त्यांच्या राजकारणात विचारसरणी पेक्षा प्रचंड पैसा, प्रचार, आणि भावनांचा उधाण अधिक दिसते. पंडित नेहरूंनी भारताला दिलेली आधुनिकतेची, धर्मनिरपेक्षतेची आणि नियोजन वादी धोरणांची दिशा भाजपसारख्या पक्षाला उमगलेली नाही, हेच त्यांच्या सततच्या नेहरू द्वेषातून स्पष्ट होते.

संजय राऊत म्हणाले की, भारतीय जनता पक्ष आणि त्याची विचारधारा ही स्वातंत्र्यानंतर उदयास आली. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात संघ विचाराचे लोक नव्हते व भाजप जन्मास आला नव्हता. त्यामुळे महात्मा गांधी, पंडित नेहरू यांच्याविषयी आजच्या मोदी भाजपमध्ये द्वेष दिसत आहे. संसदेत पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूरवर चर्चा झाली, पण चर्चेत काय दिसले? पंतप्रधान मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री शहा, विदेश मंत्री जयशंकर, भाजपचे अध्यक्ष नड्डा या सगळ्या महान नेत्यांनी पहलगाम हल्ल्याचे खापर पं. नेहरूंवर फोडले. ही त्यांची वैचारिक दिवाळखोरी आहे. भारत-पाक युद्धात चीन पाकिस्तानच्या बाजूने उभा राहिला.

सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५

# चंद्रपूर महासागर

पान ३

## बल्लारपूर शहर व तालुका कांग्रेस कमेटी तर्फे जाहीर सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**बल्लारपुर, दि. ३ ऑगस्ट** :बल्लारपूर चे माजी नगराध्यक्ष व जेष्ठ कांग्रेस पार्टी नेते घनश्याम मूलचंदानी यांची महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमेटीच्या सचिव पदी, बल्लारपूर विधानसभा उमेदवार संतोष सिंह रावत यांची महासचिव पदी आणि एन. एस. यू. आय. चे माजी राष्ट्रीय सचिव रोशनलाल बिट्टू यांची सचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल बल्लारपूर शहर व तालुका कांग्रेस कमेटी द्वारे जाहीर सत्कार कार्यक्रम रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ७ वाजता पी डब्ल्यू डी रेस्ट हाऊस बल्लारपूर येथे आयोजित करन्यात अलेला आहे .

## स्वरप्रज्ञा संगीत विद्यालयाने वाहिली मोहम्मद रफी यांना श्रद्धांजली

**ब्रम्हपुरी, दि. ३ ऑगस्ट :** ब्रम्हपुरी येथे ३१ जुलै २०२५ रोजी महान गायक मोहम्मद रफी साहेबांच्या पुण्यस्मरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्या निमित्याने रफी साहेबांची निवडक गिते सादर करण्यात आली.

या संगीत कार्यक्रमात स्वरबहार सुरेश बनकर, संजय बनकर यांनी रफी साहेबांची सदाबहार गीते गायन करून उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. उत्कृष्ट हार्मोनियम वादक लखन कुंभारे, तबला संगत रवी ठेंगरी, ढोलक संगत राकेश पिल्लेवान यांनी उत्तम साथसंगत केली.या कार्यक्रमाला शशिकांत बांबोळे , हेमंत खोब्रागडे , मधुकर खरकाटे यांनी उपस्थित राहून संगीत मैफलीचा आनंद लुटला.

# संपूर्णता अभियानात उत्कृष्ट कामगिरीबद्दल चंद्रपूर जिल्हाधिकारी सन्मानीत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि. ३ ऑगस्ट** :'आकांक्षित जिल्हे व तालुके' कार्यक्रमांतर्गत १ जुलै २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या संपूर्णता अभियान मधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या वतीने प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरव करण्यात आला.

हा सन्मान नागपूर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सभागृहात पार पडलेल्या राज्यस्तरीय सन्मान समारंभात प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी श्री. गौडा यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याने संपूर्णता अभियानातील सहापैकी सहा इंडिकेटर्स पूर्ण केले. विशेष बाब म्हणजे यापैकी तीन इंडिकेटर्स आरोग्य विभागाशी संबंधित असून ते १०० टक्के समृद्ध करण्यात आले होते.समारंभप्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव राजेश कुमार देवरा, अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, अप्पर मुख्य सचिव (नियोजन) राजकुमार उपस्थित होते.

यावेळी जीवती तालुक्यातील यशस्वी सहभागाचे प्रतिनिधीत्व करत गटविकास अधिकारी लक्ष्मीनारायण दोडके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील टेंभे, आकांक्षित तालुका समन्वयक गणेश चिंटकुंटलवार व 'उमेद'चे राजेजी दुधे यांनीही सन्मान स्वीकारला.

या यशामध्ये जिल्हा परिषद चंद्रपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हास्तरीय समन्वयक यांचे मार्गदर्शन महत्वाचे ठरले. विशेषतः जीवती तालुक्यातील आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जिद्द, चिकाटी व समर्पण भावनेने केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली.

# तिसऱ्या रेल्वे ट्रॅकच्या कामासाठी परवानगी पेक्षा मोठ्या प्रमाणात मुरमाचे उत्खनन

### स्थानिक महसूल अधिकाऱ्याचे कंपनिसोबतच संगनमत ५०० कोटी रुपयांच्या महसुलास चुना



शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून उत्खनन झालेल्या ठिकाणी जाऊन मोका पंचनामा केला आहे ज्या कंपनीला मुरूम उत्खननांची परवानगी दिली त्याच्यापेक्षा जास्त पर्यंत उत्खनन झाल्याचे निष्पन्न झाले आहे या उत्खननाची रितसर बांधकाम विभागामार्फत मोजणी करून सोनाइ इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात वरिष्ठांना अहवाल पाठविण्यात आला आहे.

**मनोज अकनुरवार ,नायब तहसीलदार भद्रावती**

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ३ ऑगस्ट :** बल्लारशा ते वर्धा या नव्या तिसऱ्या रेल्वे मार्गाच्या भर भराईसाठी उचल केलेला मुरूम आणि प्रत्यक्ष महसूल विभागाकडून यासाठी मिळालेली परवानगी यामध्ये बरीच तफावत आहे. नंदोरी बु. या भागातील शेतांमधून ८ हजार ब्रास उत्खननाची परवानगी दिली असताना प्रत्यक्षात दोन लाखांचे वर ब्रास मुरमाचे उत्खनन झाले आहे. यात जवळपास ५०० कोटी रुपयांच्या महसुलास शासनाला चुना लागला असल्याची माहिती शेतकरी संरक्षण समिती अध्यक्ष विठ्ठलराव बदखल यांनी पत्र परिषदेत दिली.

बल्लारशा ते वर्धा या तिसऱ्या नव्या रेल्वे ट्रॅकचे काम पुणे येथील सोनाई इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला मिळाले. या कंपनीने तालुक्यातील नंदोरी बु.या भागातील शेतामधील मुरमाचे उत्खनन करून वाहतूक करण्याचा परवाना तहसीलदार राजेश भांडारकर यांचे कडून मिळविला. यात या कंपनीला यांनी ८ हजार ब्रास मुरूम उत्खननाची परवानगी दिली. सोनाई इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने हे काम खुराना या ठेकेदाराला दिले. त्याने त्या ठिकाणाहून ८ हजार ब्रास ऐवजी २ लाख ब्रासचेवर मुरमाचे उत्खनन केले आहे. उत्खनन नंदोरी बु. या भागातील शेतकरी देविदास उमरे, नरेंद्र जीवतोडे ,बाललक्ष्मी बोलगिनीवार, राजु बोलगिणीवार, आणि निवास बोलगिणीवार यांचे शेतातून केली आहे.परवानगी पेक्षा मोठ्या प्रमाणात झालेल्या उत्खननामुळे त्याठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने शेजारच्या शेतकऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यांच्या शेतात जाण्या - येण्याचा रस्ता यामुळे बाधित झाला आहे. याबाबत सर्वात प्रथम लिखित तक्रार ७ फेब्रुवारी२५ ला तहसीलदार, जिल्हा खणीकर्म अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना करण्यात आली. यावर कारवाई न झाल्याने दि. २२मे २५ ला जिल्हा कनिकर्म अधिकारी चंद्रपूर तर १८ जून २५ ला जिल्हाधिकारी यांना पुन्हा तक्रार केली. शेवटी दि. २६ जूनला विभागीय आयुक्त नागपूर यांना या संदर्भात तक्रार करण्यात आली. वरील सर्व तक्रारी पुराव्यांशी प्रत्यक्ष भेटून दिल्याची माहिती विठ्ठलराव बदखल यांनी यावेळी दिली. या प्रकरणाची एसआयटी चौकशी करून या प्रकरणात कंपनीशी साठगाठ असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करून त्यांना निलंबित करण्यात यावे, उत्खनन करणाऱ्या कंपनीला काळ्या यादीत टाकावे, खड्ड्यांमुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या शेताला भविष्यात होणारा धोका टाळण्यासाठी खड्ड्याच्या तळापासून वरपर्यंत सिमेंट काँक्रेटची भिंत बांधून देण्यात यावी अशा मागण्यांचा यात समावेश असल्याचे बदखल यांनी सांगितले. सदर प्रकरणात १५ दिवसात कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाचा अवलंब करून आंदोलनात्मक भूमिका घेऊन न्याय मिळवून असा इशाराही शेवटी त्यांनी दिला. या पत्रपरिषदेला सुनील उमरे, कांताप्रसाद केवट ,सुधाकर जीवतोडे, संजयठावरी, बुद्धराज केवट, नीलकंठ वाढई ,प्रमोद जीवतोडे, प्रणय उमरे, अशोक राजूरकर, प्रकाश उमरे प्रजत उमरे यांचेसह शेजारील शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# पृथ्वीराज चव्हाण यांच्या वादग्रस्त वक्तव्याचा युवासेनेच तर्फे तीव्र निषेध



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ३ ऑगस्ट :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील निकालानंतर राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी 'भगवा दहशतवाद नाही, तर हिंदू दहशतवाद / सनातनी दहशतवाद म्हणा' असे वादग्रस्त वक्तव्य करून हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या. या विधानाचा युवासेनेच्या वतीने गांधी चौक, भद्रावती येथे तीव्र निषेध करत जोरदार आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, युवासेना विदर्भ सचिव शुभम नवले, कार्यकारणी सदस्य हर्षल शिंदे, व युवासेना जिल्हाप्रमुख आलेख रट्टे यांच्या मार्गदर्शनात तसेच माजी उपजिल्हाप्रमुख महेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात पार पडले. आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत, 'सनातन संस्कृतीचा अपमान खपवून घेतला जाणार नाही', 'भगव्या प्रती अपमान करणाऱ्यांना माफी मागावीच लागेल' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

पृथ्वीराज चव्हाण यांनी तातडीने माफी मागावी, अन्यथा संपूर्ण राज्यभर आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही यावेळी युवासेनेच्या वतीने देण्यात आला. या आंदोलनात युवासेनेचे महेश जिवतोडे ,सुरज शहा, सुमित हस्तक, सिंगलदीप पेंदाम,मनीष बुच्चे, सोनू बोनागिरी, राज चौहान, पीयुष सिंग, संदीप चटपकर, माजी सरपंच रवी ढवस, मुनेश्वर बदखल, यश निमसरकर, हेमंत सातपुते व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

या आंदोलनामुळे स्थानिक नागरिकांच्यातही असंतोषाची भावना निर्माण झाली असून, समाजात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या अशा विधानांचा सर्वत्र निषेध व्यक्त केला जात आहे.

# रणरागिनी फाउंडेशन च्या वतीने सावन मेल्याचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**बल्लारपुर, दि. ३ ऑगस्ट** :शहरातील प्रतिष्ठित सामाजिक सेवा संस्था रणरागिनी हिरकणी फाउंडेशनने २ ऑगस्ट रोजी संत तुकाराम हॉल येथे भव्य 'सावन मेळा' आयोजित केला होता. या कार्यक्रमात शहरातील २०० हून अधिक महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमात सावन क्वीन, जुळी जोडी, ग्रुप डान्स तसेच मनोरंजक खेळ अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. ग्रुप डान्समध्ये नटराज ग्रुपला प्रथम क्रमांक, बीएचआर ग्रुपला द्वितीय क्रमांक आणि पंजाब क्वीन्सला तृतीय क्रमांक मिळाला. सावन क्वीन स्पर्धेत सुश्री तेजस येगिनवार प्रथम क्रमांक, प्रीती कथोड द्वितीय क्रमांक आणि नॅन्सी छाब्रा तृतीय क्रमांकावर राहिली. जुळी जोडी स्पर्धेत नम्रता आणि पूजा मालू विजेत्या ठरल्या, तर पूनम आणि सुनीता काब्रा यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या कार्यक्रमात बंपर लकी ड्रॉसह अनेक मनोरंजक उपक्रमांचा समावेश होता, ज्यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला आणि कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेतला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सुश्री संध्या ग्वालपंची होत्या.

# भद्रावती शहरात टपरीवर डुप्लिकेट ईगल तंबाकू चा वाढला वापर

### शौकींन ग्राहकांना अरेरावी भाषेचा होतो वापर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ३ ऑगस्ट** :चंद्रपूर जिल्यात अवैध सुगंधित तंबाकू वर बंदी असली तरी लुका छुपी करून हि ईगल तंबाकू ची अवैध तस्करी मात्र जोरात सुरु आहे. त्याचा पळसाद सध्या भद्रावती शहरात खर्रा टपरीवर ८० टक्के ईगल तंबाकू चा वापर वाढल्याने खर्रा शौकिनांना चांगलाच फटका बसलेला दिसत आहे. २० टक्के माझा मागणाऱ्या खर्रा शौकीनांना पानटपरी वर अरेरावी भाषा केल्याच्या तक्रारी अनेक ग्राहकाकडून बोलल्या जात आहे. परिणामी अशा टपरीच्या तक्रारी करायच्या कुठे ? जिल्हा पोलीस कि जिल्हा प्रशासन ? असा खर्रा शौकिनांना प्रश्न निर्माण होताना दिसून आलेला आहे.

भद्रावती शहरात आणि तालुक्यात पानटपरी ची संख्या दिवसे न दिवस वाढत असून या अवैध तंबाकू तस्करीतून दरमहा कोठ्यावधी ची उलाढाल होत असून अन्न औषधी प्रशासन निद्रा अवस्थेत का दिसत आहे. यावर स्थानिक पोलीस प्रशासनाच्या कारवाई होत नसल्याने अशा खर्रा टपरी वर खर्रा शौकींन ग्राहकांना अरेरावी भाषेचा वापर होतो.यावर तक्रार करण्यासाठी सज्ज असलेले जिल्हा पोलीस कि जिल्हा प्रशासन ? अधिकचे लक्ष केंद्रित करण्याची मागणी दिसत आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठेनी वंचितांच्या न्यायासाठी आयुष्य घालविले : राजु येले




**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ ऑगस्ट** : मातंग समाज सेवा समिती, चंद्रपूर च्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. ०१ ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला. स्थानिक बिनबा वार्ड येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सामाजिक सभागृहामध्ये अण्णाभाऊ यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून त्यांच्या स्मृतिस अभिवादन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास समाजभुषण व अण्णाभाऊ साठे स्मृतीभुषण पुरस्काराचे मानकरी राजुभाऊ येले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडलेल्या या जयंती सोहळ्याला अरूण कांबळे, प्रशांत डोंगरे, अजय येले, रविंद्र डोंगरे, बंडू पायघन, पंडितराव पायघन, अशोक वानखेडे , सतिश डोंगरे, गोपाल पडघाने, किशोर वानखेडे, ताईबाई डोंगरे, साक्षी डोंगरे, विना येले, शारदा गवळी, शितल येले, काजल उचले यांचेसह अन्य समाजबांधव उपस्थित होते.

यावेळी राजु येले यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत त्यांनी अण्णाभाऊंच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक व कामगार विश्वातील त्यांच्या कार्याविषयी उपस्थित समाजबांधवांना माहिती दिली. अण्णाभाऊंचे कार्य पददलीत व विकासापासून कोसोदूर असणाऱ्या समाजाच्या उत्थानाकरिता होते. त्यांनी आपल्या साहित्यातून वंचितांचे प्रश्न मांडून त्यांना जगण्याची नवी दिशा प्रदान केली असेही राजु येले यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

यावेळी अरूण कांबळे यांनी सुध्दा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्वातंत्र्य समरातील योगदानाबाबत अत्यंत सविस्तरपणे माहिती देवून अण्णाभाऊंच्या विचाराचा वारसा मातंग समाज बांधवांनी चालवून समाजाच्या उन्नतीमध्ये योगदान देण्याचे आवाहन केले.

# एचएमएस ट्रेड युनियनमध्ये शेकडो कामगारांचा भव्य पक्षप्रवेश कार्यक्रम संपन्न



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ३ ऑगस्ट :** घुग्घुस वेकोलि वणी क्षेत्रामध्ये एचएमएस ट्रेड युनियनला एक मोठी बळकटी मिळाली, जेव्हा शनिवारी आयोजित भव्य कार्यक्रमात शेकडो कामगारांनी युनियनची सदस्यता घेतली. हा पक्षप्रवेश कार्यक्रम घुग्घूस येथील टेंपो क्लबमध्ये पार पडला. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी कोल इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व जेबीसीसीआयचे सदस्य शिवकुमार यादव होते.

कार्यक्रमादरम्यान वणी क्षेत्रातील आयटक युनियनचे माजी क्षेत्रीय अध्यक्ष जियाउल्लाह खान यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह एचएमएस युनियनमध्ये प्रवेश घेतला. शिवकुमार यादव यांनी सर्व नविन सदस्यांचे शाल,श्रीफळ देऊन स्वागत केले. यावेळी इंटक युनियनचे क्षेत्रीय सचिव रामपाल वर्मा, देशमाने आणि सुनील जानवे यांनीही आपल्या समर्थकांसह युनियनमध्ये प्रवेश घेतला.

या सदस्यता कार्यक्रमात महिलांचाही मोठा सहभाग होता. श्रीमती ईश्वरी केडाम यांचे शिवकुमार यादव यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक स्वागत केले. युनियनमध्ये सामील होणाऱ्या सर्व कामगारांना पारंपरिक गमछा घालून सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे या वेळी मोठ्या संख्येने महिला कामगारांनीही सदस्यत्व स्वीकारले, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

मुख्य अतिथी शिवकुमार यादव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले, 'प्रत्येक कार्यकर्त्याने स्वतःला शिवकुमार समजून युनियनसाठी कार्य केले पाहिजे. आपली एकता हीच आमची खरी ताकद आहे. मी नेहमीच आपल्यासाठी आणि आपल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी तत्पर राहीन.'

कार्यक्रमाचे स्वागतपर भाषण एचएमएस युनियनचे क्षेत्रीय अध्यक्ष दिपक जयस्वाल यांनी केले. यावेळी जेबीसीसीआय सदस्य शरद दांडे, वेकोलि वेल्फेअर बोर्ड सदस्य संजय खाडे आणि शंकर खत्री यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्षेत्रीय महामंत्री विकास सोनटक्के, क्षेत्रीय जीसीसी समिती सदस्य जुबेर अहमद, वेल्फेअर समिती सदस्य दत्तात्रेय डब्बावार, त्रिपक्षीय समिती सदस्य योगेश पराते, गिरीश बेले, अमर जुमडे, घुग्घूस उपक्षेत्रीय अध्यक्ष नंदकिशोर पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

मंच संचालन त्रिपक्षीय समिती सदस्य भारत जीव आणि इम्तियाज रजाक यांनी केले, तर आभार प्रदर्शन क्षेत्रीय महामंत्री विकास सोनटक्के यांनी केले. पैनगंगा उपक्षेत्रीय अध्यक्ष श्याम सिंदुला, सचिव अरविंद उलमाले, प्रेम गंगाधरे, मंगेश भोयर, प्रशांत अड्डुर आदींचा महत्त्वाचा सहभाग लाभला.

# कोळसा वाहतुक रेल्वे लाईनकरिता जमिनीचे अधिग्रहण स्वतः वेकोलिने करावे : हंसराज अहीर

### कढोली, मानोली, गोवरी येथील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाची भेट



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ ऑगस्ट** : वेकोली बल्लारपूर क्षेत्रांतर्गत, कोळसा वाहतुकीकरिता, बाबुप्-ेठ-सास्ती बी.जी. रेल्वे लाईन उभारणीसाठी, राजुरा तालुक्यातील, कढोली, मानोली, गोवरी या गावातील शेतजमिनी अधिग्रहीत करण्यात येणार आहेत. या अधिग्रहणामुळे भविष्यात अनेक ज्वलंत प्रश्न, समस्या व अडचणी उद्धवणार असल्याने या समस्यांचे निराकरण नोकरी व स्थानिकांना रोजगार तसेच अधिग्रहीत शेतजमिनीला वाजवी वाढीव दर मिळण्याकरिता संबंधित शेतकऱ्यांनी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांना विविध मागण्या अंतर्भुत असणारे निवेदन सादर केले.दि. ०२ ऑगस्ट २०२५ रोजी हंसराज अहीर यांच्या जन-संपर्क कार्यालयास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य राकेश हिंगाणे, रामपूर ग्रा.पं. माजी सरपंच रमेश कुडे व विठोबाजी हिंगाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत इतर मागास प्रवर्ग व अन्य प्रवर्गातील शेतकऱ्यांनी भेट देवून हंसराज अहीर यांचेशी सविस्तर चर्चा करून या मागण्यांविषयी न्याय मिळवून देण्याची मागणी केली. सदर अधिग्रहण वेकोलिने सी.बी. ॲक्ट १९५७ नुसार क-रावे अशी मागणीही संबंधित शेतकऱ्यांनी अहीर यांचेकडे केली.

सदर मागणी रास्त व न्यायपूर्ण असल्याचे सांगत आयोगाचे अध्यक्ष अहीर यांनी यापूर्वी वेकोलि प्रबंधनाने गोयेगाव रेल्वे सायडिंग व अन्य ठिकाणी स्वतः जमिनीचे अधिग्रहण करून प्रकल्प निर्माणासाठी जमीन रेल्वे विभागास सुपूर्द केली होती. त्याचप्रमाणे या प्रकल्पात सुद्धा वेकोलीने अधिग्रहण करावे ज्यामुळे शेतकऱ्यांना रोजगार मिळेल तसेच या रेल्वे लाईनमुळे शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी दोन भागांमध्ये विभाजित होणार असल्याने या जमिनीचे महत्व व मुल्य कमी होणार असल्याने सदर नुकसानीपोटी संबंधित शेतकरी पर्याप्त मोबदल्यास पात्र असल्यामुळे त्यांना न्याय देण्याची व इतरही लाभ उपलब्ध करण्याची जबाबदारी स्वीकारून वेकोलिने कार्यवाही करावी अशी अपेक्षा व्यक्त करून या प्रकरणात आपण विशेष लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन उपस्थित शेतकऱ्यांना दिले.

## राजुरा येथे महाआरोग्य शिबिर

**राजुरा, दि. ३ ऑगस्ट** :-समाजीक उत्तर दायित्व म्हणुन काम करणारे माजी मंत्री, आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्य महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय राजुरा येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करून ४३६४ लोकांना आरोग्य तपासनी व औषध उपचाराचा लाभ देण्यात आला.

जिल्ह्यात कुठेही आरोग्याची समस्या भासली तर लोकांच्या ओठी आशेने सुधीरभाऊंचे नाव येते. त्यामुळे सेवा असा समानार्थी शब्दच आता जिल्ह्यात रूढ झाला आहे. त्यासाठी त्यांच्या सेवाभावी व्यक्तिमत्त्वाला साजेसा उपक्रम राबवून ३० जुलै हा त्यांचा वाढदिवस महाआरोग्य शिबीरासारख्या आरोग्यसेवेच्या माध्यमातून साजरा करण्यासाठी आम्ही संकल्पबद्ध आहोत.

## भाजपा भिसीच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**चिमूर, दि. ३ ऑगस्ट** : भारतीय जनता पार्टी भिसी च्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पन करून शुक्रवार ला अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी भाजपा चे जेष्ठ नेते घनश्याम डुकरे, किशोर मुंगले ,निलेश गभने , पंकज गाडीवार, शेखर रेवतकर , कृष्णा तेजने सर, किशोर नेरलवार, लीलाधर बंन्सोड, अजय शेरकी रामु जाजू , धोंडू खवसे ,अतुल पारवे, राजु सातपुते , राजु बानकर, रवि लोहकरे, सागर श्रीरामे , विनोद खवसे , लक्ष्मण नैताम, दीपक नौकरकर, संजय पायघन बालू बावणे, अजय पायघन,विलास दिघोरे, मनोज लोहकरे, मनोज अहेर , विनोद वरघने , सुधाकर मेंघरे तसेच भारतीय जनता पार्टी चे जेष्ठ नेते, पदाधिकारी, सदस्य, शक्तीकेंद्र प्रमुख, बुथ अध्यक्ष , असंख्य कार्यकर्ते व समाज बांधव उपस्थित होते.

# आयटकचा तालुका स्तरीय मेळावा

### आशा वर्कर व गट प्रवर्तक यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या- कॉ. विनोद झोडगे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ३ ऑगस्ट** : आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (आयटक) ब्रम्हपुरी तर्फे शासकीय विश्राम गृह येथे तालुकास्तरीय कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला. मेळाव्याला मार्गदर्शक म्हणून आयटक राज्य सचिव कॉ.विनोद झोडगे पाटील,खोरीपा नेते जीवन बगाडे,प्रशांत डांगे, पदमाकर रामटेके सर,डेव्हिड शेंडे,संघटनेच्या तालुका अध्यक्ष कॉम.वर्षा घुमे,ज्योत्स्ना ठोंबरे,उद्धघाटनाप्रसंगी जिल्हाध्यक्ष कॉं. विनोद झोडगे यांनी छाया बोदेले, करुणा चंहानदे, अलका जिभकाटे, करुणा उरकुडे, अंजुषा डवरे,सीमा शेंडे उपस्थित होते.उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना कॉ.विनोद झोडगे पाटील यांनी सांगितले की सप्टेंबर २०१८



पासून केंद्र शासनाने मोबदल्यामध्ये कोणती वाढ केली नसून कोरोनाच्या काळात आशा वर्कर व गटप्रवर्तक कडून महत्त्वाचे काम करून घेतल्या नंतर सुद्धा आता पर्यंत ग्रामपंचायत व नगर पंचायत कडून मार्च २०२० ते ऑक्टोबर २२ पर्यंत थकीत मोबदला दिलेला नाही. परंतु कोरोना नंतर ज्या कामाचा मोबदला मिळत असे त्या कामाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणामध्ये मोफत मध्ये शक्तीने राबवण्याचा केंद्र सरकार प्रयत्न करीत आहे. त्यामुळे मानधन वाढीकरता केंद्र शासनाचे विरोधात मोठा लढा लढणे गरजेचे आहे. रिटायरमेंट नंतर ५ लाख रुपये ग्रॅज्युटी, निवृती वय मर्यादा ६५ वर्ष करण्यात यावे. १० हजार रुपये मासिक पेन्शन, एच . बी.एन.सी.७ भेटीचे नोट कम कॅमेरा मध्ये फोटो काढण्याची आशा वर्कर ला शक्ती करू नये. २ हजार रुपये दिवाळी बोनस आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना मिळावा तसेच त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा याकरिता चालू वर्षात मोठे आंदोलन करण्याची गरज असल्याचे सांगितले. यावेळी जीवन बगाडे, प्रशांत डांगे , पदमाकर रामटेके यांनी ही मार्गदर्शन करून ८ ऑगस्ट रोजी ब्रम्हपुरी येथे जनुरक्षा विधेयक मागे घ्या यासाठी विशाल मोर्चा काढण्यात येणार आहे तेव्हा सर्वांनी सहभागी असे आवाहन केले.

आशा वर्कर व गट प्रवर्तक यांच्या चळवळीला कमजोर करण्याकरता मानधनाची तफावत ठेवून द्वेष निर्माण करण्याचा घाट महायुती सरकारने केला. त्याचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटत असून राज्य शासनाला भविष्यामध्ये त्याचे परिणाम भोगावे लागतील असे त्यांनी सांगितले. केंद्र सरकार व राज्य सरकार नवीन कामगार कायदे लागु करत असून त्यामधून कामगारांना किंवा कामगार चळवळीला मोठे धोके उत्पन्न होणार असून त्याविरुद्ध केंद्र - राज्य सरकारच्या कामगार विरोधी धोरणा विरुद्ध कामगारांनी आयटक चे नेतृत्वात संघटितपणे लढा लढणे गरजेचे आहे असे वर्षा घुमे यांनी सांगितले. यावेळी तालुक्यातील शेकडो आशा व गट प्रवर्तक कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# शेतकरी व सामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून काम करा : आ. देवराव भोंगळे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ३ ऑगस्ट** : शेतकऱ्यांना व सामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून प्रामाणिकपणे जबाबदारीने काम केले तर त्याचा आनंद मोठा असतो, शहरातील रस्ते स्मार्ट होत असताना आता महाराष्ट सरकारने शेतात जाणारे पाणंद रस्ते तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे सोईचे होईल. उपविभागीय अधिकारी रवींद्र माने कर्णधार म्हणून टीमचे चांगले नेतृत्व करीत आहे.त्यामुळे त्यांची टीम जबाबदारीने काम करीत आहे, शासनाची प्रत्येक योजना तळागाळातील सामान्य,गरजू नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजे असे प्रतिपादन आमदार देवराव भोंगळे यांनी केले.

१ ऑगस्ट २०२५ हा दिवस 'महसूल दिन' म्हणुन साजरा केला जातो. राजुरा उपविभागात १ ऑगस्ट, २०२५ ते ७ ऑगस्ट,



२०२५ या कालावधीत 'महसूल सप्ताह-२०२५ चा शुभारंभ राजुरा येथे आमदार देवराव भोंगळे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी महसूल विभागातील उत्कृष्ठ कर्मचाऱ्यांना आमदार देवराव भोंगळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सोबतच काही नागरिकांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी रवींद्र माने, तहसीलदार ओमप्रकाश गोंड, पोलीस निरीक्षक सुमित परतेकी, नायब तहसीलदार जितेंद्र गादेवार, किशोर तेलंग, गावंडे, भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, तालुकाध्यक्ष वामन तुराणकर, शहराध्यक्ष सुरेश रागीट, जिल्हा उपाध्यक्ष सुनील उरकूडे, दिलीप गिरसावळे, प्रदीप पाला, हरिदास झाडे, नितीन वासाडे, सचिन बल्की, रवी ठाकूर, सागर भटपल्लीवार, सीनू उत्तनुरवार, दीपक झाडे, माया धोटे, योगिता भोयर आदी उपस्थित होते. यावेळी महसूल विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आमदार देवराव भोंगळे.व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी राजुरा महसूल उपविभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कारगिल विजय दिवसा निमित्त सरदार पटेल महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ ऑगस्ट** : सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे २६ जुलै २०२५ रोजी 'कारगिल विजय दिवस' निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मेरा युवा भारत, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वकृत्व स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शरयू पोटनुरवार, प्रमुख अतिथी मेरा युवा भारत, चंद्रपूरचे जिल्हा समन्वयक ?ड. देवा पाचभाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, डॉ. कुलदीप आर. गोंड, डॉ. पुरुषोत्तम माहोरे, डॉ. निखिल देशमुख, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या संचालिका डॉ. पुष्पांजली कांबळे, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे



स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्पर्धकांच्या वकृत्वातून कारगिल विजय दिनाचे महत्त्व आणि हा दिवस साजरा करण्यामागील उद्देश प्रभावीपणे समोर आला. या स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेत दर्शन मेश्राम यांनी प्रथम क्रमांक, पियुष गुरनुले यांनी द्वितीय क्रमांक, तर रितेश पाल यांनी तृतीय क्रमांक पटकावला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी. एम. काटकर यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

दरम्यान सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अरविंद पोरेड्डीवार, कार्याध्यक्ष आ. किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सगुणाताई तलांडी, सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष संदीप गड्डमवार, सर्वोदय शिक्षण मंडळाचे कार्यकारी सदस्य, राकेश पटेल, सुरेश पोटदुखे, चंद्रशेखर वाडेगावकर, जिनेश पटेल यांनी उपरोक्त उपक्रमाबद्दल शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा अध्यक्षपदी संतोष कुंदोजवार यांची निवड

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ३ ऑगस्ट** : चंद्रपूर जिल्हा क्रीडा,कला,कार्यानुभव निदेशक संघटनेच्या जिल्हाध्यक्ष पदी संतोष कुंदोजवार यांची तर सचिव म्हणून अमोल आवारी याची निवड करण्यात आली आहे जिल्हा क्रीडा,कला,कार्यानुभव निदेशकाची चंद्रपूर येथे विशेष बैठक घेण्यात आली संघटनेच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली तसेच संघटनेची नवीन कार्यकारणी गठीत करण्यात आली त्यात अध्यक्ष संतोष कुंदोजवार, सचिव अमोल आवारी,उपाध्यक्ष शालू काळे,सह सचिव विशाखा गुजर,कार्याध्यक्ष नितीन चौथाले,कोषाध्यक्ष रवींद्र तेलसे, तर सदस्य म्हणून रुपेश वनकर,गणेश आकेवार,अंजली धर्मपुरीवार, राजश्री चहारे,उर्मिला बंदुकवार,संजीवनी बावणे,अश्विनी तेलंग,अनिल झाडे,सुधीर पेंदराम याची निवड करण्यात आली.

# परिस्थिती ही अपयशाचे कारण नव्हे : विशाल वैद्य

### सेवानिवृत्त शिक्षकांचा निरोप समारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ३ ऑगस्ट** : 'शुन्यातुन विश्व निर्माण करता येते' हे सत्य आहे माजी राष्टपती भारतरत्न ए पि जे अब्दूल कलाम यांनी गरिब परिस्थितीवर मात करिता देशाचा महान व्यक्ती म्हणून ओळख निर्माण केली जि प शाळेत शिकणारे विद्यार्थी परिस्थिती कमकुवत जरी असली तर जिद्दी व चिकाटीने परिश्रम केल्यास यश नक्की पदरी येत असतो त्यामुळे परिस्थिती ही अपयशाचे कारण नव्हे असे प्रतिपादन वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल वैद्य यांनी सांगितले

चिमुर तालुक्यातील प्रसिद्ध असलेले मौजा कोलारा येथील जिल्हा परिषद शाळा येथे सेवानिवृत्त शिक्षकांचा निरोप समारंभ व फॉरेस्ट



दिन कार्यक्रम सपन्न झाला

सेवानिवृत जेष्टशिक्षक नरेंद्र कामडी यांनी पूर्ण बारा वर्षे सेवा दिली ३१ ला सेवानिवृत झाले त्यानिमीत्याने कोलारा ग्राम पंचायत व शाळा व्यवस्थापन समिती नरेंद्र कामडी यांना शॉल शिफ्रल देऊन त्यांना निरोप देण्यात

जिल्हा परिषद शाळेतील मुलानी विविध झाडाचे बिया पासुन तयार केलेल झाडाची लागवड करण्यात आले होते त्या सर्व सहभागी विद्यार्थ्यांना भेट वस्तु देण्यात आले

निरोप समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष शोभाताई कोयचाडे होते तर प्रमुख पाहुणे वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल वैद्य वनरक्षक शिवा रोकड सदस्य गणेश येरमे सत्कारमुर्ती नरेंद्र कामडी ।म अध्यक्ष मधुकर जिवतोडे गजानन सिडाम चारुल परिहार दिपा ताई रेखा गणविर संगिता कारमेंगे इंद्रायनी रामटेके आदी मान्यवर उपस्थितीना मान्यवरानी मोलाचे मार्गदर्शन केल

कार्यक्रम यशस्वीतेकरिता ग्रा प सार्वजनिक वाचनालय गुजन सावसाकड , उमेश जिवतोडे अप्रिता चॉधरी रिना नन्नावरे मुख्याधापक किशोर गभने दामोधर रामटेके मधुकर बोकडे आदिने परिश्रम घेतले

## भव्य मिशन यात्रेच्या स्वागतार्थ भाजपच्या वतीने शीतपेय वाटप



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ ऑगस्ट** : भव्य श्रीश्याम निशाण यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने काढण्यात आलेली मिशन यात्रा शहरातून भव्य उत्साहात पार पडली. यात्रा गांधी चौक येथे पोहोचताच भारतीय जनता पार्टी चंद्रपूर विधानसभा क्षेत्राच्या वतीने यात्रेतील भाविकांचे स्वागत करण्यात आले. यावेळी दुर्गा वैरागडे, विमल कातकर, अल्का झाडे, यांच्यासह भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या स्वागताच्या कार्यक्रमात शीतपेय वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेतील सहभागी हजारो श्यामप्रेमींना उन्हाच्या तीव्रतेत थंड शीतपेय देऊन त्यांचा थकवा घालवण्याचा प्रयत्न भाजपच्या कार्यकर्त्यांनी केला. या सेवेमुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात्रेच्या मार्गावर भक्तीमय वातावरण, आणि श्यामप्रेमींनी दिलेला जल्लोष यामुळे संपूर्ण शहरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पोंभूर्णा येथे महसुल सप्ताहाचे शुभारंभ

### नागरिकांच्या सेवेसाठी -१ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट पर्यंत विविध उपक्रम

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभूर्णा, दि. ३ ऑगस्ट** :- शासकीय योजनांची माहिती व योजनेचा लाभ नागरीकांना घेता यावा यासाठी दरवर्षी महसुल सप्ताह राबविण्यात येते. दि.१ ते ७ ऑगस्ट दरम्यान सदर सप्ताह राबविण्यात येत असुन १ ऑगष्ट रोजी पोंभूर्णा तहसील कार्यालयात महसुल सप्ताहाचा शुभारंभ महसूल संवर्गातील उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन व लाभार्थ्यांना विवीध प्रकारचे दाखले व नवीन राशन कार्ड देऊन करण्यात आले. महसुल सप्ताहाचे उद्घाटन तहसीलदार मोहनिश शेलवटकर यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी नायब तहसीलदार रामकृष्ण उईके, विकास जिडगिलवार,



दिपाली आत्राम, पुरवठा निरीक्षक भारती गभणे आदी मान्यवर उपस्थित होते. महसूल सप्ताहानिमित्त २ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करण्याबाबत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. ३ ऑगस्ट रोजी पाणंद व शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे, ४ ऑगस्ट रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' प्रत्येक मंडळनिहाय राबविणे, ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील थेट लाभ हस्तांतरणय (डीबीटी) न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करणे, ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व ती अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेणे आणि ७ ऑगस्ट रोजी कृत्रीम वाळू धोरणाची (एम-सँड) अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता याबाबत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पोंभूर्णा तहसीलदार मोहनिश शेलवटकर यांनी केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार रामकृष्ण उईके, संचालन सहाय्यक महसूल अधिकारी संतोष खोब्रागडे, आभार ग्राम महसूल अधिकारी विरेंद्र वाळके यांनी मानले.कार्यक्रमाला अधिकारी व कर्मचारी तसेच तालुक्यातील शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

## महसूल सप्ताह अंतर्गत पांदण रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ ऑगस्ट** : महसूल सप्ताह अंतर्गत चंद्रपूर तालुक्यातील सर्व मंडळातील पाणंद रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी नागाळा व वाढोली येथे उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) शुभम दांडेकर, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, ना. तहसीलदार सचिन खंडाळे, मंडळ अधिकारी, तलाठी कोतवाल, पोलिस पाटील, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पतेतुन १ ऑगस्ट पासून महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाचा एक भाग आहे, सर्व पाणंद रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे. त्या अनुषंगाने आज चंद्रपूर तालुक्यात मोहीम स्वरूपात पाणंद रस्त्यालगत झाडे लावण्याची कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

# बल्लारपूरमध्ये घाण आणि भटक्या प्राण्यांची दहशत, प्रशासन झोपले आहे का?

### आम आदमी पक्षाचा' थेट प्रश्न; नागरिकांच्या जीवाशी खेळणे थांबवा!

**महासागर प्रतिनिधी**

**बल्लारपूर, दि. ३ ऑगस्ट** : बल्लारपूर शहरात वाढत्या घाण आणि भटक्या प्राण्यांच्या गंभीर समस्येमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. बल्लारपूर नगरपरिषद प्रशासन याकडे पूर्ण लक्ष देत नसल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे. या संदर्भात आज पक्षाच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. 'आप'चे शहराध्यक्ष रवी पुप्पलवार यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला आहे की जर या समस्यांवर त्वरित कारवाई केली नाही तर आक्रमक भूमिका घेतली जाईल.

स्वच्छता अभियानाच्या नावाखाली कर वसुली, पण स्वच्छता कुठे?



शहराच्या अनेक भागात कचऱ्याचे ढीग आहेत, रस्त्यांच्या कडेला झुडपे वाढली आहेत आणि बंद केलेल्या नाल्यांमधून दुर्गंधी पसरत आहे. 'स्वच्छता अभियान'च्या नावाखाली नागरिकांवर घर करात ३६० रुपयांचा अतिरिक्त बोजा आकारला जात असताना, मग शहर इतके घाणेरडे का आहे असा संतप्त सवाल 'आप'ने केला आहे. पावसाळ्यापूर्वी नाल्यांची स्वच्छता न झाल्यामुळे अनेक ठिकाणी घाणेरडे पाणी साचले आहे, ज्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे. ३१ जुलै रोजी विनंती करूनही प्रशासनाने यावर कोणतेही गांभीर्य दाखवले नाही, असा आरोपही पत्रात करण्यात आला आहे.

भटक्या प्राण्यांवर कारवाई नाही!

घाणीसोबतच भटक्या प्राण्यांची समस्याही गंभीर आहे. गुरेढोरे आणि कुत्रे रस्त्यांवर आणि चौकात बसून वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण करतात. २० जुलै रोजी या विषयावर विनंती करूनही प्रशासनाने शहरातील भटक्या प्राण्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे.

'आप'च्या इशाऱ्यानंतर प्रशासन जागे झाले!

प्रेस नोटमध्ये पुढे म्हटले आहे की, 'आप'च्या आक्रमक भूमिकेनंतर मुख्याधिकारी विशाल वाघ यांनी अखेर दखल घेतली आहे. पुढील एका आठवड्यात संपूर्ण बल्लारपूर शहर स्वच्छ करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. यासोबतच त्यांनी तातडीने स्वच्छता विभागाचे अधिकारी गणवीर यांना फोन करून तिन्ही भागातील स्वच्छता निरीक्षकांना तातडीने स्वच्छता करण्याचे आदेश दिले.

प्रशासनाच्या या आश्वासनामुळे तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी, हे काम पूर्ण झाल्यावरच 'आप' समाधानी होईल. 'आप' नागरिकांच्या हितासाठी आणि बल्लारपूर स्वच्छ करण्यासाठी वचनबद्ध आहे, असेही पक्षाने म्हटले आहे.

शहराध्यक्ष रवी पुप्पलवार, संघटन मंत्री रोहित जंगमवार, प्रवक्ते आसिफ शेख, महिला अध्यक्षा किरण खन्ना, सलमा सिद्दीकी, शेखर तेलरांधे आणि इतर उपस्थित होते.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांचा ऑटोरिक्षा संघटनेतर्फे वाढदिवसानिमित्त सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ ऑगस्ट** : महाराष्ट्र ऑटोरिक्षा चालकमालक संघटनेच्या वतीने ३० जुलै २०२५ रोजी मा.आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त ३० ऑटोरिक्षा चालकांनी रक्तदान केले. चांगुनाबाई मुनगंटीवार म्हाडा कॉलनी दाताळा रोड चंद्रपूर येथे वृक्षारोपन करण्यात आले. त्याची सविस्तर माहीती आ. सुधीर मुनगंटीवार यांना देण्याकरीता ऑटोरिक्षा संघटनेतर्फे स्वागत करण्यात आले.

आज दि. ०२ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी अर्थमंत्री यांचे स्वागत यांच्या जनसंपर्क कार्यालयात सर्व ऑटोरिक्षा चालकांनी



जयघोष करत सत्कार करण्यात आला. या सत्काराप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र खांडेकर, जिल्हाध्यक्ष मधुकर राऊत, जिल्हा सचिव सुनिल धंदरे, जिल्हा उपाध्यक्ष विनोद चन्ने, कोषाध्यक्ष किशोर वाटेकर, प्रसिध्दी प्रमुख राजु मोहुर्ले, विश्वेवर राऊत, राकेश पवार, महेश ढेकरे, जनार्धन गुंजेकर, सचिन बांगडे, अरविंद उमरे, राजु यादव, भैय्याजी मोहुर्ले, खुशाल साखरकर, नरेंद्र अस्वले, प्रदिप वरभे, सुनिल देऊळकर, विजय मडावी, अंकुश कौराते, विलास बावणे, विलास जुमडे, प्रदिप शिवनकर, वासुदेव कुबडे, रमेश मुन, मुशीर शेख या प्रसंगी उपस्थिती होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

